स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**

**बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे - ४११ ०१६**

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४/२५६५७१७६ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र. :तंशिविकापु/शैवि-५/कर्मयोगी भारत/२०२३/ 3959 दिनांक : 24 AUG 2023

**परिपत्रक अत्यंत महत्वाचे.**

प्रति,
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व शासकीय संस्था. (पुणे विभाग पुणे)

उपसचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ
विभागीय कार्यालय, पुणे

**विषय :- उच्च व तंत्र शिक्षण विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना " कमयोगी भारत" पोर्टल वर प्रशिक्षण देणेबाबत..**

**संदर्भ :- १)** तंत्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र. ०३/आयटीसेल/२०२३/कर्मयोगी भारत/४३ दिनांक ०८.०८.२०२३.

२) शासन परिपत्रक क्रमांक इएसटी-४४२३/प्र.क्र.१५१/आस्था-१, दि. १४ जुलै, २०२३

उपरोक्त विषयाबाबतचे सोबत जोडलेले संदर्भीय शासन परिपत्रक पहावे.

सदर बाबत कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकानुसार राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी व त्यांचे अधिनस्त सर्व विभागीय कार्यालयांमधील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी "कर्मयोगी भारत" पोर्टल वर ऑनलाईन नावनोंदणी करुन विविध प्रशिक्षण घेणे अनिवार्य केलेले आहे. "कर्मयोगी भारत" पोर्टल वर नोंदणी करण्याची व प्रशिक्षण घेण्याची कार्यपध्दती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये विहीत केलेली आहे.

त्याअनुषंगाने या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना मिशन कर्मयोगी पोर्टलवरील शासन परिपत्रकात नमूद प्रशिक्षण पुढील दोन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावे व प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र संबंधित आस्थापना शाखेकडे सादर करण्यात यावे.

प्रशिक्षणाची लिंक http://igotkarmayogi.gov.in अशी आहे.

सोबत : संदर्भीय पत्र.

**(मा. रा. जाधव)**
प्र. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४६९/४०३,
ई-मेल–desk3@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dte.maharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## परिपत्रक

जा.क्र. ०३/तंशिसं/आयटीसेल/२०२३/कर्मयोगी भारत/ ६३ दिनांक :- ०८-०८-२०२३

**विषय** :- उच्च व तंत्रशिक्षण विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना "कर्मयोगी भारत" पोर्टल वर प्रशिक्षण देणेबाबत ...

**संदर्भ** :- शासन परिपत्रक क्रमांक: इएसटी-४४२३/प्र.क्र.१५१/ आस्था-१, दि.२४ जुलै,२०२३ उ व तं शि, मंत्रालय, मुंबई

उपरोक्त विषयाबाबतचे सोबत जोडलेले संदर्भीय शासन परिपत्रक पहावे.

सदर बाबत कळविण्यात येते कि, सोबत जोडलेल्या शासन परिपत्रकानुसार राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी व त्यांचे अधिनस्त सर्व विभागीय कार्यालयांमधील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी "कर्मयोगी भारत" पोर्टल वर ऑनलाईन नावनोंदणी करून विविध प्रशिक्षण घेणे अनिवार्य केलेले आहे. "कर्मयोगी भारत" पोर्टल वर नोंदणी करण्याची व प्रशिक्षण घेण्याची कार्यपद्धती सोबत जोडलेल्या परिशिष्ट- अ मध्ये विहित केलेली आहे.

तरी उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना मिशन कर्मयोगी पोर्टलवरील शासन परिपत्रकात नमूद प्रशिक्षण पुढील दोन महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावे व प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र संबंधित आस्थापना शाखेकडे सादर करावे.

प्रशिक्षणाची लिंक http://igotkarmayogi.gov.in अशी आहे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**सोबत** :- शासन परिपत्रक व परिशिष्ट-अ

**प्रत** :-
१. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,आस्था-१, मंत्रालय, मुंबई यांना माहितीकरिता सविनय सादर.
२. तंत्रशिक्षण संचालनालयातील सर्व कार्यासने
3. सर्व विभागीय कार्यालये
४. निवड नस्ती (का.क्र.3)

पत्र प्राप्त झाले
16 AUG 2023
आवक लिपिक
तंत्र शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, मुंबई-१.

उच्च व तंत्र शिक्षण विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना "कर्मयोगी भारत" पोर्टलवर प्रशिक्षण देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग.
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग ,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन परिपत्रक क्रमांक : इएसटी-४४२३/प्र.क्र. १५१ /आस्था-१
दिनांक : २४ जुलै, २०२३

शासन परिपत्रक-

केंद्र शासनाने "कर्मयोगी भारत" नावाने शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी ऑनलाईन पोर्टल सुरु केलेले आहे. मिशन कर्मयोगी हा प्रकल्प राज्यात दिनांक १२ मे, २०२३ रोजी सुरु करण्यात आला आहे. राज्यातील विविध शासकीय विभांगातील /कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांना मिशन कर्मयोगी या प्रकल्पाच्या माध्यमातून क्षमता वृध्दी करण्याकरिता राज्यात हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षण पोर्टलवर अनेक उपयुक्त प्रशिक्षणे विनाशुल्क उपलब्ध आहेत. सदर पोर्टलचा वापर करुन राज्यातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी विविध प्रकारची उपयुक्त प्रशिक्षणे घेणे आवश्यक आहे. त्यानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना "कर्मयोगी भारत" पोर्टलवरील विविध प्रशिक्षणे घेणे अनिवार्य करण्यात येत आहे.

२. सदर पोर्टलवर "GEMS use, General Financial Rules, Ethics या आणि अशा प्रकारच्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना उपयुक्त ठरणा-या अनेक प्रशिक्षण कार्यक्रमांचा समावेश आहे. "कर्मयोगी भारत" पोर्टलवर नोंदणी करण्याची व प्रशिक्षण घेण्याची कार्यपध्दती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये विहित केलेली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभाग (मंत्रालय खुद्द) मधील सर्व कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांनी पोर्टलवरील उपयुक्त प्रशिक्षणाचा लाभ घेणे आवश्यक आहे.

३. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी मिशन कर्मयोगी पोर्टल वरील खालील नमूद प्रशिक्षण पुढील दोन महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावे व प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र आस्थापना शाखेकडे सादर करावे.

लिंक-http://igotkarmayogi.gov.in/

१. Digital Literacy
२. Noting and Drafting
३. Code of Conduct for Government Employees
४. Effective Communication
५. Introduction to Government E Marketplace
६. Stay Safe in Cyber Space

४. उपरोक्त विषयांबाबतचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर, शासकीय कामकाज तसेच व्यक्तिमत्व विकासाच्या अनुषंगाने अन्य प्रशिक्षणांचाही लाभ घेता येऊ शकतो.

५. उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व संचालनालयांनी त्यांचे अधिनस्त सर्व अधिकारी/कर्मचारी यांना ते कार्यरत असलेल्या ठिकाणी उपरोक्तप्रमाणे ऑनलाईन प्रशिक्षण घेण्यासाठी आदेश द्यावेत व कार्यपूर्तीचा अहवाल सादर करावा.

६. तसेच सदर प्रशिक्षणाबाबत काही अडचणी असल्यास, श्री.ओमकार कंधारकर, सहायक कक्ष अधिकारी भ्रमणध्वनी क्र.७०२०९२६९६५ यांच्यांशी संपर्क साधावा.

सोबत :- परिशिष्ट-अ

(हे.सु.पाठक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सर्व उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक,कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी/उच्चश्रेणी लघुलेखक/सहायक कक्ष अधिकारी/लिपिक-टंकलेखक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती.

# परिशिष्ट-अ

## "कर्मयोगी भारत" प्रशिक्षण कार्यपध्दती

Google Chrome/Mozilla/ Firefox/Microsoft

↓

I got Karmayogi

↓

Home Page कर्मयोगी भारत

↓

Register yourself through Government email Id For example :- xxx@nic.in/xxx@gov.in/xxx@mah. gov.in/ xxx@mahapwd.gov.in/xxx@maharashtra. gov.in

↓

Fill details

↓

Home Page कर्मयोगी भारत

↓

Search - Time Management
Filter search - Learning Resource

↓

Participate in Training